N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** खेड **Year (वर्ष):** 2022
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0406 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 07/06/2022 20:13 बजे

2. **S.No. (अ.क्र.) Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 07/06/2022
      **Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 07/06/2022
      **Time From (वेळेपासून):** 12:34 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 12:34 बजे

   **(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 07/06/2022 **Time (वेळ):** 20:09 बजे

   **(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
   **Entry No. (नोंद क्र.):** 047 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/06/2022 20:09 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1. **(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 1 किमी
      **Beat No. (बिट क्र.):**

   **(b) Address (पत्ता):** चव्हाण चेंबर इमारतीच्या, दुस-या मजल्यावरीलतलाठीकार्या,ताखेड जि पुणे येथे

   **(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
   **(a) Name (नाव):** अक्षय रोहिदास वाळुंज
   **(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
   **(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1996 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
   **(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**
   **(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
   **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
   **(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
   ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

   **(h) Address (पत्ता):**

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ. क.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | वाळद,ताखेड,जिपुणे ,खेड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | वाळद,ताखेड,जिपुणे ,खेड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री सुजित सुधाकर अमोलिक | | | 1. फ्लट नं105,लाइनपिंग बिल्डींग, भैरवनगर,धानोरी,पुणे,खेड,पुणे ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी अक्षय रोहिदास वाळुंज ,वय 26 वर्षे, धंदा- शेती, राहणार- वाळद,ता.खेड,जि.पुणे. मोबाईल नंबर 9112211664 मी आज रोजी खेड पोलीस स्टेशन येथे समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन वर नमुद पत्यावर कुटुंबासह राहण्यास असुन माझा शेती व्यवसाय आहे. दि. 31/05/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे येथे तेथील श्रीमती क्रांती पवार,पोलीस उपअधिक्षक यांना फोनवरुन मी तक्रार केली होती.त्यानंतर मला श्रीमती क्रांती पवार मडम,लाप्रवि पुणे यांनी माझ्या मोबाईलवर संपर्क करुन माझी तक्रारीच्या अनुषंगाने आमच्या लाप्रवि कार्यालयाकडील पोलीस निरीक्षक श्रीमती ज्योती पाटील यांना मी पुढील कारवाईसाठी तुमच्याकडे पाठविते, त्या तुम्हाला फोन करतील, असे सांगितले. त्यानंतर दि. 31/05/2022 रोजी मला पोलीस निरीक्षक, श्रीमती ज्योती पाटील,लाप्रवि पुणे यांनी दुरध्वनीदवारे संपर्क साधला. त्यावेळी मी माझी लाच मागणी तक्रार त्यांना कथन केली. त्यानंतर दि.05/06/2022 रोजी मी श्रीमती ज्योती पाटील यांना फोनवरुन मी कळविले कि, मला श्री अमोलिक यांनी माझे 7/12 सदरी नोंदीसंदर्भात सकाळी वाडा तलाठी कार्यालयात बोलाविले आहे. असे सांगितल्यानंतर त्यांनी आम्ही पथकासह तेथे उदया येतो असे सांगितले, दरकवाडी गावाजवळ भेटण्याचे ठरविण्यात आले. ठरल्याप्रमाणे दि.06/06/2022 रोजी दरकवाडी जवळ 12:45 वाजेच्या दरम्यान पोलीस निरीक्षक श्रीमती ज्योती पाटील मडम त्यांचे पथक व दोन शासकीय पंचासह त्यांचेकडील वाहनाने दरकवाडी गावाजवळील चासकमान धरणाजवळ पोहोचल्या.त्याठीकाणी रोडच्या कडेला त्यांनी त्यांचे वाहन उभे करण्यास सांगुन त्यांनी त्यांची,स्टाफ व दोन्ही पंचाची ओळख करुन दिली.मी ही माझी ओळख करुन दिली. तसेच पोलीस निरीक्षक श्रीमती ज्योती पाटील यांनी पथक व दोन्ही पंचा समक्ष माझी तक्रार विचारली असता ती मी कथन केली. त्यानंतर मी माझी तक्रार लिहुन दिली ती पुढील प्रमाणे-मी वरील प्रमाणे असुन,माझे आजोबांनी त्यांच्या मालकीच्या 11 गुंठे शेत जमीनीची विक्री केली व ती पुन्हा त्या शेतमालकाकडुन 11 गुंठे शेतजमीन माझ्या आजोबांनी खरेदी केली. गेले दोन तिन महीन्यांपासुन सदर खरेदीची नोंद घालण्यासाठी तहसिल कार्यालय,खेड येथ मी पाठपुरावा केला असताना तहसिलदारांनी नोंद करण्याचा आदेश दिल्यानंतर सर्कल वाडा, श्रीमती बडे मडम यांनी माझ्या आजोबांच्या शेतजमिनीचे खातादुरुस्ती दस्तऐवज करुन दिले. सदर दुरुस्तीनंतर मी तलाठी श्री सुजित अमोलिक यांना मे महिन्यात भेटलो असता त्यांनी सातबारा सदरी नोंद करणेकरीता माझ्याकडे 5000/-रु.ची मागणी केली. सदरची लाच रक्कम देण्याची माझी ईच्छा नसल्याने मी आज रोजी त्यांच्या विरुध्द आपल्या कार्यालयाकडे तक्रार देत आहे तरी आपण त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी ही विनंती, वगैरे मजकुराची तक्रार माझे हस्ताक्षरात नोंदविली. सदरची तक्रार पो.नि.ज्योती पाटील यांनी दोन्ही पंचाना दाखविली. त्यावर पंचानी व पोलीस नरीक्षक श्रीमती ज्योती पाटील यांनी सहया केल्या. माझे तक्रारीवरुन लाच मागणी अनुषंगाने पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरले. त्यानंतर योग्य त्या सुचना देवुन माझे सोबत व्हाईस रेकर्डर देवून पंच साक्षीदार श्री दिलीप इंगळे यांचेसह लाचेच्या मागणी संदर्भात पडताळणी करणेसाठी, वाडा येथील तलाठी कार्यालयात तलाठी श्री सुजित अमोलिक यांना भेटण्यासाठी गेलो. सदर ठिकाणी मी पंचासमक्ष श्री अमोलिक यांची भेट घेतली.

यावेळी त्यांचेत व माझेत वाळद येथील खरेदी केलेल्या जागेच्या 7/12 नोंदी करणेसंबंधी चर्चा केली. त्यानंतर लोकसेवक श्री अमोलिक यांनी नोंद करुन देण्यासाठी, पाच दे, त्यावर मी चार देतो असे म्हणालो त्यावर त्यांनी तुझे हिशोबाने कर,आजच कर, मी आहे इथ,मग मी जाणार आहे, असे म्हणुन तडजोडीअंती 4,000/-रु. मागणी काल केली. त्यानंतर तलाठी श्री अमोलिक यांनी केलेल्या लाच मागणीप्रमाणे मी माझ्याकडील रोख रक्कम 4,000/-रुपये पंचासमक्ष हजर केली. त्यानतर पथकातील श्री आंबेकर यांनी अन्थसिन पावडर पंचासमक्ष 4,000/- रु.च्या नोटांना लावून माझ्या पन्टीच्या पुढील बाजुस उजव्या खिशात ठेवले. त्यानंतर मला व्हाईस रेकर्डर सोबत देवुन पंच श्री इंगळे यांचेसह तलाठी, श्री अमोलीक यांची भेट घेण्यासाठी वाडा,तलाठी कार्यालयात पाठविण्यात आले त्यावेळी तलाठी श्री अमोलिक यांची भेट झाली नाही त्यामुळे त्यावेळी कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. पुन्हा काही वेळाने तलाठी श्री अमोलिक कार्यालयात आले असतील या अंदाजाने पुन्हा मला व्हाईस रेकर्डर सोबत देवुन, 4000/-रु. लाच रकमेसह व पंच श्री इंगळे यांचेसह तलाठी,श्री अमोलीक यांची भेट घेण्यासाठी वाडा,तलाठी कार्यालयात पाठविण्यात आले त्यावेळीही तलाठी श्री अमोलिक यांची भेट झाली नाही त्यामुळे त्यापुढे कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. त्यानतर दि. 06/06/2022 रोजी रात्री मी तलाठी श्री अमोलिक यांना फोन करुन विचारले असता त्यांनी उदया 11 वाजेपर्यंत खेड तलाठी कार्यालयात, फोन करुन ये असे सांगितले. याबाबत मी पोलीस निरीक्षक श्रीमती ज्योती पाटील यांना फोनवरुन कळविले. आज दि. 07/06/2022 रोजी पुन्हा सापळा कारवाईचे नियोजन करण्यात आले. त्यावेळी मी माझ्याकडील रोख रक्कम 4,000/-रु. पंचासमक्ष श्रीमती पाटील यांचेकडे हजर केली. सदर नोटांना श्री आंबेकर यांनी अन्थ्रासीन पावडर लावुन माझ्या पन्टीच्या पुढील उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर मला व्हाईस रेकर्डर सोबत देवुन पंच श्री इंगळे यांचेसह श्री अमोलिक यांची भेट घेण्यासाठी खेड येथील चव्हाण चेंबर इमारतीच्या दुस-या मजल्यावरील तलाठी कार्यालयात पाठविण्यात आले त्यावेळी माझ्या पाठोपाठ सापळा पथक सापळा लावुन इतरत्र तलाठी कार्यालयाच्या बाहेर थाबले. तलाठी श्री अमोलिक यांनी माझ्या जागेच्या 7/12 नोंदीसंदर्भाने माझेशी चर्चा केली त्यांनंतर मी चार हजार रुपये आणले आहेत असे सांगितल्यानंतर त्यांनी असु दे, मी टाकतो तुला कल करतो असे म्हणुन मला लाच रक्कम टेबलावर ठेवण्याचा ईशारा केल्याने मी त्याप्रमाणे लाच रक्कम 4,000/रु. मी त्यांच्या समोरील टेबलावर ठेवले. त्यांनतर मी सापळा पथकास लाच रक्कम स्विकारलेचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी तलाठी श्री अमोलिक यांना पंचासमक्ष सापळा पथकाने ताब्यात घेतले. त्यावेळी तलाठी श्री सुजित अमोलिक यांना त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारले असता त्याचे नाव 1) श्री सुजित सुधाकर अमोलिक,वय 50 वर्षे,धंदा नोकरी (तलाठी टोकावडे,भिमाशंकर,भिवेगाव,भोमाळे,भोरगिरी) रा. फ्लट नं.105,लाइनपिरा बिल्डींग,भैरवनगर,धानोरी,पुणे अशी सांगितली. सदरबाबत सविस्तर सापळा पंचनामा करणे बाबतची कार्यवाही खेड पोलीस ठाणेत करण्यात आली. तरी माझ्या आजोबाच्या नावे असलेली वाळद येथील खरेदी केलेल्या शेतजमिनीची नोंद 7/12 सदरी घेण्यासाठी श्री सुजित सुधाकर अमोलिक यांनी 5,000/-रु.ची लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 4,000/-रु. लाचेची मागणी रक्कम आज रोजी दुपारी 12:34 वाजेच्या दरम्यान चव्हाण चेंबर इमारतीच्या दुस-या मजल्यावरील तलाठी कार्यालयात स्वीकारली म्हणुन त्यांचेविरुदध माझी फिर्याद आहे.माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आली असून ती मी वाचून पाहिली असून बरोबर आहे. समक्ष (ज्योती पाटील) पोलीस निरीक्षकलाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे

**3.Action** Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** shatishkumar vilasrav gurav(I (Inspector)) / **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

Signature / Thumb impression of the complainant / informant

Date and time of dispatch to the court

Signature of Officer in charge, Police Station

Name

Rank: Inspector

No.